■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – २९१ ■ बुधवार दि.९ जुलै २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 291 ■ Wednesday Dt.9 July 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# अहो आमदार महोदय, निवडणुकीपूर्वी राजेगाव ते सादोळा रस्त्याचे उद्घाटन मतं मिळवण्यासाठी होते का?

## आमदार प्रकाश सोळंके जनतेला अजून किती फसवणार? आमदाराविरुद्ध तीव्र संताप!

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564



# रस्त्यांचे उद्घाटन म्हणजे फक्त मतांचा खेळ आणि फोटोशूटचा कार्यक्रम? उद्घाटन झाले, पण रस्ता अजूनही खड्ड्यात!

## फक्त उदघाटन करून मत मिळवण्याचा आ.प्रकाश सोळंके यांचा नवा फंडा?

## उद्घाटन होऊन गेले, पण त्यानंतरच्या देखभालीचं काय? कामाच्या गुणवत्तेचं काय?

माजलगाव । प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यातील माजलगाव मतदारसंघात आमदार प्रकाश सोळंके यांनी माळेवाडी सुलतानपुर या ठिकाणी हॅम अंतर्गत सादोळा ते राजेगांव या सुमारे ६० कोटींच्या कामाचे उदघाटन मोठा कार्यक्रम घेऊन केले होते. पण तो रस्ता अजूनही जैसे थे आहे त्यामुळे विद्यमान आमदार प्रकाश सोळंके तुम्ही अजून जनतेला किती फसवणार? असा सवाल मतदारसंघातील जनता करत आहे. विरोधक आणि स्थानिक नागरिकांच्या दृष्टीने हे उद्घाटन फक्त जनतेचे मतं मिळवण्यासाठी करण्यात आलेले एक पॉलिटिकल ट्रिक असल्याचा आवाज उठत आहे.





प्रकाश सोळंके हे राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार गटातील आमदार असून, त्यांच्या राजकीय कारकीर्दीवर अनेकदा प्रश्नचिन्ह उभे राहिलेले आहेत. या रस्त्याच्या उद्घाटनाबाबतही त्यांनी निवडणुकीपूर्वी जनतेसमोर आपली छबी सुधारण्यासाठी हा उपक्रम केल्याची टीका होत आहे. निवडणूकीत मतांचा फायदा घेण्यासाठी हे केले गेले असल्याचे सांगण्यात येत आहे. रस्त्याच्या उद्घाटनाचे वेळापत्रक आणि निवडणूक कालावधी यातील संबंध विचारात घेतल्यास हे आयोजन फक्त जनतेची मतं मिळवण्यासाठी केले गेले असण्याची शक्यता वाजवी आहे. अशा प्रकारच्या कृतीमुळे राजकारणातील नैतिकतेवर प्रश्न उभे राहतात आणि जनतेतील राजकीय विश्वास कमी होतो. ग्रामस्थ आणि मतदार यांचा विश्वास जपण्यासाठी व पारदर्शकतेसह विकास कामे करणे अत्यंत आवश्यक आहे.या रस्त्याची एवढी दुरावस्था झाली आहे एवढे खड्डे पडलेत की वाहन चालवताना जीवघेणी कसरत करावी लागते. एखादे पेशंट घेऊन जाताना रस्त्यावरच मृत्यु होऊ शकतो अशी अवस्था आहे तरीही आमदार याकडे दुर्लक्ष करतात.




सभापती जयदत्त नरवडे यांनी पण लोकांना वेड्यात काढल्यामुळे त्यांच्या विरूद्ध पण तीव्र संताप व्यक्त होत आहे.

दादांच्या लाडक्या सभापती जयदत्त नरवडे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. जनतेला ठणकावून सांगितले की दादांनी या रस्त्याची मंजूरी आणली आहे. दादांमुळेच हा रस्ता होणार आहे. पण अजून का झाला नाही असा सवाल जनता करत आहे व यामुळे सभापती जयदत्त नरवडे यांनी पण लोकांना वेड्यात काढण्याचे काम केले त्यामुळे जयदत्त नरवडे यांच्या विरोधात पण लोकांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. तर या रोडच्या कामात जयदत्त नरवडे यांची पण भागीदारी असल्याचे सांगण्यात येते त्यांनी कागदोपत्री रस्ता दाखवून बीले तर उचलले नाहीत याची पण चौकशी होणे गरजेचे आहे.

यावेळी त्यांनी येणाऱ्या जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणूका डोळ्यासमोर ठेवून याचा फायदा होईल हा पण उद्देश होता. पण या भागातील जनता जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत यांना व आमदाराच्या उमेदवारांना घरचा रस्ता दाखवणार असल्याचे बोलले जात आहे.

# जुगार अड्ड्यावर छापा, ७० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त, ७ आरोपी गजाआड

पिंपळनेर । प्रतिनिधी

पिंपळनेर पोलिसांनी आज, दि. ०८.०७.२०२५ रोजी मौजे मैंदा येथे सुरू असलेल्या एका जुगार अड्ड्यावर छापा टाकून ७ जुगारींना अटक केली. त्यांच्याकडून रोख रक्कम आणि तीन मोटारसायकलींसह एकूण सुमारे ७०,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमुळे परिसरात अवैध धंद्यांना चाप बसल्याचे बोलले जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पिंपळनेर पोलीस ठाण्याचे पोउपनि गोलवाल साहेब यांना गुप्त बातमीदारामार्फत मैंदा गावातील अर्जुन अंकुशकर यांच्या घराशेजारील लिंबाच्या झाडाखाली काही इसम तिर्रट नावाचा जुगार खेळत असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली.



या माहितीच्या आधारे, पोउपनि श्री. गोलवाल साहेब यांनी प्रभारी अधिकारी सपोनि श्री. घुगे साहेब यांना कळवून सपोनि मधुसूदन घुगे, पोउपनि अर्जुन गोलवाल, पोशि/८८७ अविनाश सानप, पोशि १२६० दिलीप सोनवणे, पोशि १९४४ वैजिनाथ मगर यांच्या पथकासह दोन पंचांना घेऊन दुपारी ३:४५ वाजता छापा टाकला. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचताच अर्जुन अंकुशकर यांच्या घराशेजारील लिंबाच्या झाडाखाली मोटारसायकली गोलाकार लावून ७ इसम पत्त्यांवर पैसे लावून तिर्रट जुगार खेळताना आढळून आले. पोलिसांना पाहताच जुगार खेळणारे इसम पळून जाण्याच्या तयारीत असताना, पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. मात्र, एक इसम आपली मोटारसायकल सोडून पोलिसांची नजर चुकवून पळून जाण्यात यशस्वी झाला.

अटकेतील आरोपींची नावे अर्जुन ईश्वर अंकुशकर (वय ३८, रा. मैंदा, ता.जि. बीड), रणजितसिंग नानकसिंग टाक (वय ३३, रा. वडवणी, ता.जि. बीड), संतोष रामनाथ मुळे (वय ३५, रा. बाहेगव्हाण, ता. वडवणी, जि. बीड), शंकर पांडुरंग ढगे (वय २७, रा. चिंचवण, ता. वडवणी, जि. बीड), सुभाष हिरामण चव्हाण (वय ३६, रा. ढोरवाडी परभणी तांडा, ता.जि. बीड), आतिष हरिदास मस्के (वय २३, रा. बाहेगव्हाण, ता. वडवणी, जि. बीड), विलास बापुराव बापमारे (वय ३८, रा. मैंदा, ता.जि. बीड) यांच्या ताब्यातुन एकूण २३८८०/

पान २ वर

# कल्याण नावाच्या मटका जुगारावर माजलगाव शहर पोलीसांचा छापा

माजलगाव । प्रतिनिधी

आज दिनांक ०८/०७/२०२५ रोजी माजलगांव शहर पोलीसांना मिळालेल्या बातमीच्या आधारे पोलीसांनी माजलगांव शहरातील जाजु हॉस्पीटलसमोर शिवाजीनगर परीसरात १६.२५ वाजता छापा मारुन मटका जुगार खेळवणारा शाम आप्पाराव भालेकर रा. अशोक नगर माजलगांव याचे ताब्यातुन कल्यान मटका जुगाराचे साहीत्य व नगदी पैसे व मोबाईल असा एकुण १३,९५०/– रुपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच मटका खेळवणारा शाम आप्पाराव भालेकर रा. अशोकनगर माजलगांव व बुकीमालक शुभम डाके रा. माजलगांव यांच्या विरुध्द गु.र.नं.२५२/२०२५ कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायद्याप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



सदरची कारवाई नवनित कॉवत, पोलीस अधीक्षक बीड, श्रीमती चेतना तिडके, अप्पर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई, निरव राजगुरु उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग गेवराई अति. पदभार माजलगांव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ, पोहवा/माधव तोटेवाड, पोलीस अंमलदार सुनिल गवळी, अंगद घोडके यांनी केली आहे.



# बीड एलसीबीची उल्लेखनीय कामगिरी २१ मोटरसायकल पकडल्या

बीड । प्रतिनिधी

पोलीस अधीक्षक, बीड यांनी बीड जिल्हयातील वाहन चोरीचे अनुषंगाने दाखल गुन्हयांचा तपास करणे बाबत पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांना आदेशीत केले होते. त्यावरुन पोनि बंटेवाड यांनी त्यांचे अधिनस्त अधिकारी पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर व त्यांचे टिमला जिल्हयातील मोटार सायकलच्या चोरीच्या गुन्हयाचा तपास करण्याचे आदेश दिले. त्यावरुन दिनांक ०५/०७/२०२५ रोजी आरोपी नामे अमित मधुकर सुतार रा.आदर्शनगर, बीड यांचेकडुन एकुण ०७ चोरीच्या मोटार सायकल जप्त केल्या असता त्यामध्ये पोलीस स्टेशन बीड शहर येथील दोन व पोलीस स्टेशन शिवाजीनगर येथील ०४ मो.सा. चोरीचे गुन्हे उघडकीस आलेले आहेत. तसेच दिनांक ०८/०७/२०२५ रोजी आरोपी नामे ऋषिकेश ऊर्फ सागर सुरेश येवले, वय २१ वर्ष रा. डोंगरकिन्ही ता. पाटोदा जि.बीड याचेकडुन एकुण १४ चोरीच्या मोटर सायकल जप्त करुन नमुद मोटर सायकल मध्ये खालील प्रमाणे गुन्हे दाखल आहेत. पोलीस स्टेशन पिंपरी चिंचवड गुरंन १०३१/२०२४ कलम ३०३ (२) बी.एन.एस. प्रमाणे गुन्हा दाखल आहे. पोलीस स्टेशन येरवडा गुरंन ६५८/२०२४ कलम ३०३ (२) बी.एन.एस. प्रमाणे गुन्हा दाखल आहे. पोलीस स्टेशन निगडी पुणे गुरंन ३७३/२०२४ कलम ३०३ (२) बी.एन.एस. प्रमाणे गुन्हा दाखल आहे. पोलीस स्टेशन निगडी पुणे गुरंन ३२३/२०२४ कलम ३०३ (२) बी.एन.एस. प्रमाणे गुन्हा दाखल आहे. पोलीस स्टेशन निगडी पुणे गुरंन ३५३/२०२४ कलम ३०३ (२) बी.एन. एस. प्रमाणे गुन्हा दाखल आहे. पोलीस स्टेशन पिंपरी चिंचवड गुरंन १११७/२०२४ कलम ३०३ (२) बी.एन.एस. प्रमाणे गुन्हा दाखल आहे. पोलीस स्टेशन लोणीकंद गुरंन १०५१/२०२४ कलम ३०३ (२) बी.एन.एस. प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

पान २ वर

# गेवराई तहसील कार्यालयातील जन्म प्रमाणपत्र घोटाळा प्रकरणी सखोल चौकशी करण्याची वंचितची मागणी

## आर.डी.सी. शिवकुमार स्वामी यांची कार्यपद्धती अन्यायकारक : अजय सरवदे

बीड । प्रतिनिधी
गेवराई तालुक्यातील तहसील कार्यालयाच्या अधिपत्याखालील जन्म प्रमाणपत्र नोंदणी प्रक्रियेत गंभीर गैरव्यवहार झाल्याचे उघडकीस आले आहे. या प्रकरणात महसूल सहायक अतुल केदार यांना अपूर्ण कागदपत्रांच्या आरोपाखाली निलंबित करण्यात आले असून, या कारवाईच्या पार्श्वभूमीवर गंभीर लाचखोरीचे आरोप समोर आले आहेत.

प्रकरणात तहसीलदार खोमणे, तसेच नायब तहसीलदार कट्टे व सोनवणे यांचाही सहभाग असूनही, त्यांच्यावर कोणतीही निलंबनात्मक कारवाई करण्यात आलेली नाही. निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी याबाबत कोणतीही कार्यवाही न करता, केवळ अतुल केदार यांच्यावरच निलंबनाची कारवाई केल्याने तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.



विश्वसनीय सूत्रांनुसार, नायब तहसीलदार कट्टे व सोनवणे यांनी दलालामार्फत उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांना प्रत्येकी २ लाख रुपये लाच दिल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे त्यांच्यावर कुठल्याही प्रकारची शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली नाही. याच प्रकरणात महसूल सहायक अतुल केदार यांना देखील दलालामार्फत १ लाख रुपये दिल्यास निलंबन टाळता येईल असा संदेश देण्यात आल्याचे समजते. मात्र, त्यांनी पैसे देण्यास नकार दिल्यामुळे एकतर्फी निलंबनाची कारवाई करण्यात आली. ही बाब संपूर्ण यंत्रणेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे. या प्रकरणावरून निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग करून निवडक कारवाई केल्याचे स्पष्ट दिसते. त्यामुळे त्यांच्या कार्यपद्धतीवरही संशय व्यक्त होत आहे. या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी करून, दोषी ठरलेल्या पुढील अधिकाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी केली आहे. निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, तहसीलदार खोमणे, नायब तहसीलदार कट्टे, नायब तहसीलदार सोनवणे, संबंधित दलाल/मध्यस्थ यांच्यावर प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक कायदा १९८८ (संशोधित) अंतर्गत गुन्हा नोंदवून, दोषींना तत्काळ अटक व निलंबन करण्याची मागणी केली आहे.

## शेतकरी पुत्र संतोष कानडे या युवकांनी शेतामध्ये पिके व्यवस्थित राहण्यासाठी बाटलीचा केला अनोखा प्रयोग




वडवणी । प्रतिनिधी
वडवणी तालुक्यातील पिंपरखेड गावातील शेतकरी पुत्र संतोष कानडे या युवकांनी आपल्या शेतात रान डुक्कर हरीण काळवीट येऊ नये म्हणून या युवकांनी जुनी कोणती बिसलरी बाटली किंवा याच्या सहकार्याने व काठी रवून हरिण शेतात येऊ नये व पिकाची नास दोस होऊ नये म्हणून यासाठी संरक्षण म्हणून एक प्रयोग केला आहे, हा प्रयोग संतोष कानडे यांनी केला आहे. स्वखर्चातून केला आहे आणि या प्रयोगाची तालुक्यात चर्चा होत आहे.

# काँग्रेसचे दत्ता कांबळे यांच्या वाढदिवसाच्यानिमित्त १००० विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वितरण

## जिल्हा परिषद शाळा वाचवण्यासाठी सामाजिक कार्यकर्त्यांनी पुढे यावे : दत्ता कांबळे

माजलगाव । प्रतिनिधी
महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस अनु. जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष तथा बहुजन विकास बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे सचिव तथा आंबेडकरी चळवळीचे सामाजिक कार्यकर्ते दत्ता कांबळे यांच्या वाढदिवसाच्या निमित्त विविध सामाजिक उपक्रम राबावण्याची परंपरा सातत्याने कायम राखली. आंबेडकरी चळवळीचे सामाजिक कार्यकर्ते हे अखिल भारतीय काँग्रेसच्या नेत्या खासदार रजनी पाटील माजी मंत्री अशोकराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सातत्याने सामाजिक उपक्रम राबावण्यात अग्रेसर असतात.

अलीकडे जिल्हा परिषद शाळा ही सर्व सामान्य लोकांच्या जिव्हाळ्याचा विषय असल्यामुळे, जिल्हा परिषद शाळा वाचली पाहिजे ही भूमिका घेऊन सामाजिक कार्यकर्ते दत्ता कांबळे यांच्या



वाढदिवसाच्या निमित्त तब्बल १००० विध्यार्थ्यांना शालेय साहित्य वितरण कारण्यात आले. सुलतानपूर, वारोळा, मालिपारगाव, नित्रूड, गोविंदवाडी, महातपुरी, सुरूमगाव, पुनणंदगाव, ब्रम्हगाव, शेलापुरी, जामगा तांडा, यळा तांडा, चाहूर तांडा, कुरण तांडा, झिजूर्डी तांडा, बाराभाई तांडा येथील जिल्हा परिषद शाळा अंतर्गत प्रति विध्यार्थी एक रजिस्टर असे एकूण एक हजार (१०००) विध्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी सदरील सामाजिक उपयोगी उपक्रमा दरम्यान जिल्हा परिषद शाळा वाचवण्यासाठी अनेक मोठ्या क्षमतेच्या सामाजिक कार्यकर्त्यांनी पुढे यावे असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते दत्ता कांबळे यांनी याप्रसंगी केले.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष बळीराम कारके, सोसिअल मीडिया जिल्हाध्यक्ष सुधाकर कांबळे, तालुका संघटक अक्षय थोरात, सामाजिक कार्यकर्ते अभिजित देडे, पत्रकार अनंत घडसिंगे, कृष्णा शिंदे, श्रीमंत कांबळे, सामाजिक कार्यकर्ते दिनेश आवाड, सामाजिक कार्यकर्ते मिलिंद मुजमुले, राजेभाऊ खंडागळे, आर.के. समूहाचे रुद्रा कासार, संकेत कासार, सामाजिक कार्यकर्ते विजय राठोड, सरपंच संतोष जाधव, सामाजिक कार्यकर्ते विलास लोंढे, मुकुंद हिवाळे, भरत काळे, गोपाल लोखंडे यांनी हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम केले. तसेच यावेळी प्रत्येक गावातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य सह स्थानिक प्रतिष्ठित नागरिक व शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष, मुख्याध्यापक व सहशिक्षक सह प्रमुख कार्यकर्ते व मित्रपरिवार उपस्थित होते.

# बीड जिल्हा एलसीबी विभागाचे प्रमुख पोलीस निरीक्षक शिवाजी बंटीवाड यांचा सत्कार

बीड । प्रतिनिधी
बीड जिल्हा एलसीबी विभागाचे प्रमुख कर्तव्यदक्ष मा.श्री इंटेलिजन्स पोलीस निरीक्षक मा श्री शिवाजी बंटीवाड साहेब यांचा हरिभक्त परायण आनंद महाराज खडकीकर यांनी केला मनस्वी सत्कार संपन्न झाला.

श्री प्रभू रामचंद्र पदस्पर्श भूमी असलेल्या श्रीक्षेत्र रामतीर्थ मठाचे परमपूज्य योगी श्री दादा महाराज खडकीकर यांचे उत्तराधिकारी हरिभक्त परायण वेदशास्त्र संपन्न आनंद महाराज जोशी खडकीकर यांनी बीड जिल्हा स्थानिक गुन्हे शाखेचे इंटेलिजन्स कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक मा श्री शिवाजी बंटेवाड साहेब यांच्या बीड जिल्हा स्थानिक गुन्हे शाखेच्या उत्कृष्ट पोलीस प्रशासकीय कर्तव्याच्या बाबतीत समाधान व्यक्त करून त्यांनी बीड जिल्हा स्थानिक गुन्हे शाखेचा मागच्या काही दिवसापूर्वी पदभार स्वीकारल्यानंतर आज



त्यांची प्रत्यक्षात भेट घेऊन श्रीक्षेत्र प्रभू रामचंद्र पदस्पर्श भूमी मठाच्या वतीने त्यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले आणि येणाऱ्या दहा तारखेच्या गुरुपौर्णिमेनिमित्त श्रीक्षेत्र रामतीर्थ या ठिकाणी महाप्रसादासाठी येण्याचे निमंत्रणही महाराजांनी बीड जिल्हा स्थानिक गुन्हे शाखेचे इंटेलिजन्स कर्तव्यदक्ष मा पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड साहेबांना दिले. या वेळी येथे उपस्थित असलेले दैनिक न्याय टाइम्स बीड तालुका प्रतिनिधी तथा महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे बीड जिल्हा संघटक संजय देवा कुलकर्णी कुक्कडगावकर उपस्थित होते.



सुवर्णाताई गिर्हे यांची जिजाऊ ब्रिगेडच्या विभागीय उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सत्कार करतांना डॉ.बाळासाहेब गिर्हे, सरपंच मोहन आमटे, ह.भ.प.भागचंद महाराज झांजे, पत्रकार अतुल जवणे, दादा कावेदार.

# भाजपाच्या प्रदेश सदस्यांच्या यादीत पंकजा मुंडे गटाचे वर्चस्व

## सर्जेराव तांदळे, विजय गोल्हार, मुंदडा राऊत यांची सदस्यपदी नियुक्ती

बीड । प्रतिनिधी
भाजपने आपली सुमारे साडेचारशे प्रदेश सदस्यांची यादी काल जाहीर केली असून यात बीड जिल्ह्यात पंकजा मुंडे गटाचेच वर्चस्व कायम असल्याचे स्पष्ट होत आहे. विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर बीड जिल्हा भाजपात सरळसरळ दोन गट पडल्याचे चित्र असले तरी भाजपने मंत्री पंकजा मुंडे गटालाच झुकते माप दिले आहे.

बीड जिल्हा भाजपात विधानसभा निवडणुकीनंतर सरळसरळ दोन गट पडले आहेत. मंत्री पंकजा मुंडे आणि आ. सुरेश धस हे एकाच पक्षात समोरासमोर आल्याने भाजपमधील हा वाद प्रदेशपातळीवर देखील चर्चिला गेला. नियोजन समितीवरील विधानमंडळ सदस्यांमधून सदस्य नेमण्याचा विषय असेल किंवा जिल्हाध्यक्ष निवडीचा, भाजपने पंकजा मुंडेंच्या शब्दालाच महत्व दिल्याचे स्पष्ट झाले होते. त्यानंतर राजप प्रदेश समितीच्या सदस्य निवडीतही भाजपने समारे साडेचारशे सदस्यांची प्रदेश समिती यादी जाहीर केली आहे.

यात स्वत: पंकजा मुंडेंसह अक्षय मुंदडा (केज) अरुण राऊत (माजलगाव), विजय गोल्हर (आष्टी), सर्जेराव तांदळे (बीड) असे सदस्य नेमण्यात आले आहेत. हे सारेच सदस्य मंत्री पंकजा मुंडेंचे निकटवर्तीय आहेत. त्यामुळे भाजपने बीड जिल्ह्यात पंकजा मुंडेंनाच मोकळा हात दिल्याचे स्पष्ट होत आहे.

# २४.८० लाख मुलींना एसटीचा आधार

पात्रुड । प्रतिनिधी
शिक्षणाची प्रचंड इच्छा असूनही केवळ गावापासून शाळा दूर असल्याने आणि प्रवासाची सोय नसल्याने अनेक मुलींना आपले शिक्षण अर्ध्यावर सोडावे लागते. ग्रामीण भागातील हे वास्तव बदलण्यासाठी राज्य शासनाची 'अहिल्याबाई होळकर योजना' एक आशेचा किरण ठरली आहे. या योजनेंतर्गत 'लालपरी' अर्थात एसटी बसने मोफत प्रवास उपलब्ध झाल्यामुळे राज्यातील लाखो विद्यार्थिनींच्या शिक्षणाचे स्वप्न पूर्णत्वास जात आहे. गत आर्थिक वर्षात तब्बल २४.८० लाख मुलींनी या योजनेचा लाभ घेतला असून, यासाठी शासनाने
६५४.२२ कोटी रुपयांचा निधी खर्च केला. प्राथमिक शिक्षणाची सोय असते. माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षणासाठी मुलींना जवळच्या शहरात किंवा मोठ्या गावात जावे लागते. प्रवासातील अडचण आणि आर्थिक परिस्थितीमुळे अनेक पालक मुलींना पुढे शिकायला बाहेरगावी पाठविण्यास कचरतात. हीच मोठी अडचण ओळखून १९९६–९७ मध्ये अहिल्याबाई होळकर योजना सुरू करण्यात आली. या योजनेमुळे इयत्ता पाचवी ते बारावीपर्यंतच्या ग्रामीण विद्यार्थिनींना घरापासून शाळेपर्यंत मोफत एसटी प्रवासाची सुविधा मिळते. यामुळे केवळ मुलींची शाळेतील गळती थांबली नाही, तर त्या उच्च शिक्षण घेऊन स्वतःच्या पायावर उभ्या राहात आहेत. सोबतच, शासनाच्या अकरावी आणि बारावीसाठी मोफत शिक्षण आणि कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयासारख्या योजनांमुळे मुलींच्या शिक्षणाला अधिक बळकटी मिळत आहे.

### आवश्यक कागदपत्र

शासनाने ठरवून दिलेला अर्ज, विद्यार्थिनीचे आधार कार्ड, शाळेत प्रवेश घेतल्याची पावती. शाळेचे बोनाफाईड प्रमाणपत्र, दोन पासपोर्ट आकाराचे फोटो अशी प्रमाणपत्र सदर योजनेंतर्गत एसटीचा मोफत प्रवास करण्यासाठी लागणाऱ्या बस पाससाठी द्यावे लागतात.

### मोफत पास मिळविण्याची प्रक्रिया

या योजनेचा लाभ घेण्याची प्रक्रिया अत्यंत सोपी केली आहे. सर्वप्रथम, शाळेचे मुख्याध्यापक पात्र विद्यार्थिनींची यादी तयार करून राज्य परिवहन महामंडळाच्या जवळच्या आगाप्रमुखांना सादर करतात. आगारप्रमुख त्या यादीनुसार विद्यार्थिनींना ३ महिन्यांसाठी मोफत प्रवास पास देतात. पुढील तिमाही पास मिळविण्यासाठी विद्यार्थिनींची शाळेत किमान ७५ टक्के उपस्थिती बंधनकारक आहे. शाळेकडून उपस्थिती प्रमाणपत्र एसटी महामंडळाला दिले जाते

# विकसित महाराष्ट्र २०४७' साठी सर्वेक्षणामध्ये नागरिकांनी मत नोंदवावे : जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

बीड । प्रतिनिधी
'विकसित महाराष्ट्र २०४७' चे व्हिजन डॉक्युमेंट तयार करण्यासाठी विविध १६ क्षेत्र निहाय नागरिकांचे मत, अपेक्षा, आकांक्षा व प्राथम्यक्रम जाणून घेण्याच्या दृष्टीने राज्यव्यापी नागरिक सर्वेक्षण करण्यात येणार आहे. नागरिकांनी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या क्युआर कोडवर आपले मत नोंदवून विकसित महाराष्ट्राच्या संकल्पनेमध्ये योगदान द्यावे. या सर्वेक्षणामध्ये नागरिकांची कोणतीही वैयक्तिक माहिती संकलित करण्यात येणार नाही. https://wa.link/o93s9m qH$dm https://vikasitmaharashtra.civis.vote/consultations/1245/read लिंकवर यावर आपले मत नोंदवावे, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे.

भारत सरकारकडून स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त भारताला सन २०४७ पर्यंत विकसित भारत –भारत२०४७ करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्याची अर्थव्यवस्था सन २०२९ पर्यंत १ ट्रिलियन डॉलर व सन २०४७ पर्यंत ५ ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहोचविणे हे राज्याचे ध्येय आहे. राज्याच्या ध्येयाची पूर्तता करण्याच्या दृष्टीने तसेच प्रत्येक क्षेत्राचा ठसा राज्याच्या अर्थव्यवस्थेवर उमटावा यासाठी विकसित महाराष्ट्र २०४७ चे



व्हिजन जाहीर करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ६ मे २०२५ ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत १५० दिवसाच्या कार्यक्रमाची घोषणा केली आहे.

या कार्यक्रमामध्ये व्हिजन डॉक्युमेंट तयार करण्याचा समावेश करण्यात आला आहे. व्हिजन डॉक्युमेंट तयार करताना दीर्घकालीन, मध्यमकालीन व अल्पकालीन अशी टप्पानिहाय उद्दिष्टे ठेवण्याचे निर्देश सर्व विभागांना देण्यात आले आहेत. व्हिजन डॉक्युमेंटचा आराखडा तयार करण्यासाठी १६ संकल्पनांवर आधारीत क्षेत्रनिहाय गट बनविण्यात आले आहेत. यामध्ये कृषि, शिक्षण, आरोग्य, ग्राम विकास, नगर विकास, भूसंपदा, जलसंपदा, पायाभूत सुविधा, वित्त, उद्योग, सेवा, सामाजिक विकास, सुरक्षा, सॉफ्ट पॉवर, तंत्रज्ञान व मानव विकास, मनुष्यबळ व्यवस्थापन असे क्षेत्रनिहाय गट असतील. या सर्व गटांनी प्रगतीशील, शाश्वत, सर्वसमावेशक व सुशासन यावर आधारित आराखडा तयार करावयाचा आहे. आराखडा तयार करताना त्या–त्या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्ती, शासकीय, अशासकीय संस्थांशी सल्लामसलत करण्यात येणार आहे.

विकसित महाराष्ट्राच्या व्हिजनमध्ये नागरिकांचे मत, अपेक्षा, आकांक्षा व प्राथम्यक्रम जाणून घेण्याच्या दृष्टीने राज्यव्यापी नागरिक सर्वेक्षण अभियानाचे उद्घाटन मुख्यमंत्री यांनी १७ जून, २०२५ रोजी केले आहे. सर्व आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी पासून गावपातळीवरील कार्यालय प्रमुखांनी सर्वेक्षणामध्ये आपले अभिप्राय नोंदवावेत यासाठी दर्शनी भागावर फलक लावावेत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. यामध्ये नागरिकांनी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या क्युआर कोडवर आपले मत नोंदवून विकसित महाराष्ट्राच्या संकल्पनेमध्ये योगदान द्यावे. या सर्वेक्षणामध्ये सहभाग घेतलेल्या नागरिकांची कोणतीही वैयक्तिक माहिती संकलित करण्यात येणार नाही.

# माळापुरीच्या चिमुकल्यांनी भरवली जिल्हा परिषद च्या प्रांगणात शाळा



बीड । प्रतिनिधी
आज माळापुरीच्या चिमुकल्यांनी जिल्हा परिषद च्या प्रांगणातच शाळा भरवली. माळापुरी च्या ग्रामपंचायत कार्यालय, पालक, गावकरी व व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्यांनी जिल्हा परिषद च्या प्रांगणात ठिय्या मांडला होता.

जिल्हा परिषद ऊर्दू उच्च प्राथमिक शाळा माळापुरी या शाळेत इयत्ता १ ली ते ७ वी पर्यंतचे वर्ग असून या शाळेची एकूण पटसंख्या २०० आहे. शाळेला गेल्या वर्षी वर्षभर मुख्याध्यापक पद रिक्त ठेवल्याने मुलांचे खुप शैक्षणिक नुकसान झाले आहे. या चालु वर्षात शाळेतील एकूण मान्य शिक्षक ७ असून फक्त ६ शिक्षक भरण्यात आलेले आहेत, शाळेची विद्यार्थी संख्या २०० आहे. एका वर्गाला शिक्षक नसल्याने मुलांचे शैक्षणिक नुकसान होत असून ही शाळा ग्रामीण भागातील जास्त विद्यार्थी असणारी शाळा आहे. या शाळेत शेतकरी, मजूर व गोरगरीब कुटूंबातील मुले, मुली, शिक्षण घेत असून त्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही. यासाठी या शाळेला एका शिक्षकाची गरज आहे. शाळेतील रिक्त असलेल्या पदावर शिक्षकाची येत्या ३ दिवसांत नियुक्ती करावी. व गोरगरीब कुटुंबातील शिक्षण घेत असलेल्या मुलांचे नुकसान होवू देवू नये यासाठी आज जिल्हा परिषद च्या प्रांगणात माळापुरी येथील ग्रामस्थांनी, पालकांनी, आणि विद्यार्थ्यांनी शाळा भरवली होती. येत्या तीन दिवसात शिक्षकाची नेमणुक जर झाली नाही तर दररोज एक वर्ग सीईओ साहेबांच्या दालनात भरविण्यात येईल असा इशारा, माळापुरी चे उपसरपंच बेग समीर कदिर, ग्रा.पं सदस्य यशवंत पडुळे, यास्मिन बेग, यांनी दिला.

पान १ वरून...

## जुगार अड्ड्यावर छापा,

– रु रोख, ७ मोबाईल व ३ दुचाकी असा एकूण रु. ३,७३,८८० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोउपनि अर्जुन गोलवाल यांनी दोन पंचांसमक्ष जागेवरच पंचनामा करून मुद्देमाल ताब्यात घेतला आणि आरोपींसह पिंपळनेर पोलीस ठाण्यात हजर झाले.

याप्रकरणी पोकॉ/२०२१ शशिकांत अण्णासाहेब ढाकणे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, कलम १२ (अ) नुसार वरील ७ आरोपी आणि पळून गेलेल्या अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पिंपळनेर पोलीस करत आहेत. सदरील कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि मधुसुदन घुगे, पोउपनि अर्जुन गोलवाल, पोलीस अंमलदार अविनाश सानप, दिलीप सोनवणे, वैजिनाथ मगर यांनी केली आहे.

## २१ मोटरसायकल पकडल्या

सदरची कामगिरी ही पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर बीड, पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड स्थागुशा बीड यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा बीड पथकातील, पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर, पोह आशोक दुबाले, पोह अंनद मस्के, पोह सोमनाथ गायकवाड, पोह देविदास जमदाडे, पोना बाळु सानप, पोकॉ ४३८ अर्जुन यादव, पोकॉ सिध्दार्थ मांजरे यांनी मिळुन केली आहे.

# केंद्र सरकारच्या कामगार - शेतकरी विरोधी आणि भांडवलदार धार्जिण्या धोरणांच्या निषेधार्थ भारत बंदला पाठिंबा

लिंबागणेश । प्रतिनिधी

केंद्र सरकारच्या कामगार विरोधी, शेतकरी विरोधी आणि भांडवलदार धार्जिण्या धोरणांचा निषेध करण्यासाठी आज दि.९ जुलै बुधवार रोजी १० केंद्रीय कामगार संघटनांनी एकत्र येऊन विविध शेतकरी आणि ग्रामीण कामगार संघटनांच्या समन्वयाने देशव्यापी संप पुकारत भारत बंद ची हाक दिली असुन याला प्रतिसाद देत बीड तालुक्यातील लिंबागणेश ग्रामस्थांनी या भारत बंदला पाठींबा देत छत्रपती शिवाजी महाराज चौकात गावच्या मुख्य प्रवेशद्वारावर केंद्र सरकारच्या विरोधात कामगार आणि शेतकरी विरोधी धोरणे राबविणाऱ्या सरकारचा धिक्कार असो, कामगार एकजुटीचा



विजय असो, शेतकरी एकजुटीचा विजय असो अशी घोषणाबाजी करत निदर्शने करण्यात आली.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे, सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ, अँड.गणेश वाणी, विक्रांत वाणी, ग्रामपंचायत सदस्य श्रीहरी निर्मळ, दामोदर थोरात, रमेश गायकवाड, अशोक जाधव, पांडुरंग वाणी, सुरेश निर्मळ, भालचंद्र गिरे,आश्रुबा गिरे, सतिश वायभट, संजय घोलप, चिंतामण ढास, गणपत घोलप, बालाजी निर्मळ, सय्यद अख्तर, संजय पावले, जनार्दन भोसले, अंकुश गायकवाड, ज्ञानोबा निर्मळ, बाजीराव दशमे, शेषेराव तागड, हरिभाऊ कदम, बाळु सोनावणे, चोखोबा निर्मळ, जनार्दन वाणी, सर्जेराव घरत, बाबासाहेब वायभट, भास्कर वाणी आदी सहभागी होते. यावेळी लिंबागणेश पोलिस चौकीचे सहाय्यक फौजदार बाबासाहेब राख, गोविंद बडे, पो.ह. सतिश राऊत आणि सुदाम शेलार यांची उपस्थिती होती.

**केंद्र सरकारच्या शेतकरी विरोधी कायद्यांमुळे शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण वाढले तर कामगारांच्या हक्कांवर गदा**

केंद्र सरकारच्या कमाल शेतजमीन धारणा (सिलिंग) कायदा, आवश्यक वस्तू कायदा, जमिन अधिग्रहण कायदा या नरभक्षी शेतकरी विरोधी कायद्यांमुळे शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण वाढले आहे. तर कामगार संघटनांनी संसदेने मंजूर केलेल्या ४ कामगार संहितेवर तिव्र आक्षेप घेतला असुन या संहितामूळे कामगारांचे हक्क कमकुवत होत असुन कामगार संघटनांची ताकद कमी होत असल्याचा दावा केला आहे. केंद्र सरकारच्या कामगार आणि शेतकरी विरोधी आणि भांडवलदार धार्जिण्या धोरणांचा लिंबा गणेश करांमध्ये तिव्र संताप असुन याविरोधात निदर्शने करत भारत बंद ला समर्थन असल्याचे डॉ.गणेश ढवळे यांनी म्हटले आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कामगार आघाडी महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी नगरसेवक अमर शेख यांची निवड

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्र बांधकाम मजूर संघटना संस्थापक अध्यक्ष नगरसेवक अमर शेख यांचे सामाजिक व राजकीय काम पाहून पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आदेशाने प्रदेश कार्यालय महाराष्ट्र कामगार आघाडी उपध्यक्षपदी शेख अमर यांची नियुक्ती उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आली.



महाराष्ट्र बांधकाम मजूर संघटनेचे संस्थापक अध्यक्ष नगर सेवक अमर शेख यांनी काही दिवसापूर्वीच मा आ अमरसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली पक्ष प्रवेश केलेला असून शेख अमर यांचे सामाजिक व राजकीय कामे पाहून पक्षाचे सरचिटणीस मा.आ. अमरसिंह पंडित, गेवराई विधानसभेचे आमदार विजयसिंहजी पंडित यांच्या शिफारशी नुसार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आदेशाने राष्ट्रवादी काँगेर्स पक्ष– कामगार आघाडी प्रदेश उपाध्यक्ष अमर शेख यांची मुंबई येथे करण्यात आली. या निवडी वेळी गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित, शेख निजाम, बळवंत चव्हाण, प्रक्षित पाटील, रईस चाऊस, नबील जमा यांची उपस्थिती होती.

## कड्यात शिपाई नाही क्षवविच्छेदन करण्यासाठी धामणगावची चक्कर

### शिपाईची जागा रिक्त असल्याने अडचणीचा सामना करावा लागतो

आष्टी । प्रतिनिधी

रस्ते अपघात आत्महत्या अशा अनेक कारणांनी मृत्यू झाल्यानंतर शवविच्छेदन करण्यासाठी कडा प्राथमिक आरोग्य केंद्रात मागील तीन वर्षापासून पुरुष शिपाई उपलब्ध नसल्यामुळे मृतदेहाची अवहेलना होत आहे धामणगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील शिपाईची वाट पाहून नातेवाईकांना या ठिकाणी मृतदेह असेल तर शवविच्छेदन गृहातठेवावा लागत आहे. आष्टी तालुक्यातील कडा हे राष्ट्रीय महामार्गावरील शहर असून प्राथमिक आरोग्य केंद्रात तीन वर्षापासून शिपाई उपलब्ध नाही. त्यामुळे या ठिकाणी मृतदेहाच्या शवविच्छेदनसाठी तर प्राथमिक आरोग्य केंद्रातील शिपाई किंवा सेवानिवृत्त शिपाई आणावा लागतो तोपर्यंत मृतदेह शिवगृहात ठेवावा लागतो शवविच्छेदन नंतर मग मृतदेह ताब्यात घेऊन नातेवाईक अंत्यसंस्कारासाठी घेऊन जातात. आष्टी तालुका आरोग्य अधिकारी यांनी याकडे लक्ष देऊन कडा प्राथमिक आरोग्य केंद्र तत्काळ अनुभवी पुरुष शिपाई द्यावे, अशी मागणी शिवक्रांती सेनेचे युवक प्रदेश अध्यक्ष दीपक सोनवणे यांच्याकडून करण्यात येत आहे.

> सामान्य प्रशासन विभागाकडून शिपायाची भरती केली जाते. याबाबत वरिष्ठाकडे पाठपुरावा सुरू असून सध्या धामणगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील शिपायाकडून मृतदेहाचे शिवविच्छेदन केले जाते.
>
> **– डॉ. राजेश तांदळे,**
> तालुका आरोग्य अधिकारी आष्टी

## मुख्यमंत्री सहायता निधी मधून रुग्णांना मिळून दिली ४५ हजार रुपयाची मदत : कैलास कावरे

सिरसाळा । प्रतिनिधी



महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, संसद रत्न खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली उपमुख्यमंत्री वैद्यकीय मदत कक्षाचे मंगेश चिवटे, कार्याध्यक्ष शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष रामहरी राऊत व आरोग्यसेवक युवासेना निरीक्षक बाजीराव चव्हाण यांच्या सहकार्याने शिवसेनेचे सर्कलप्रमुख कैलास कावरे यांनी प्रणव आदिनाथ ठोंबरे राहणार अंबुलगा तालुका चाकूर जिल्हा लातूर येथील १२ महिन्याच्या लहान मुलाच्या मेंदू रोग या आजारावरील उपचाराकरिता विशेष प्रयत्न करून ४५ हजार रुपयाची मदत मुख्यमंत्री सहायता निधीतून मंजूर करून देऊन संबंधित कुटुंबाला शिवसेना सर्कलप्रमुख रुग्णसेवक कैलास कावरे यांनी खूप मोठा आधार दिला आहे. रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा हा प्राण मनात बाळगून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वैद्यकीय सेवेचा घेतलेला वसा आणि त्यांचे सेविक्री म्हणून बाजीराव चव्हाण यांच्या पेरणेतून त्यांच्या मार्गदर्शनाखाली सिरसाळा सर्कलप्रमुख रुग्णसेवक कैलास कावरे हे अनेक रुग्णांच्या मदतीसाठी सहकार्य करत असतात त्यांच्या या मदतीमुळे अनेक रुग्ण त्यांच्याकडे मदतीसाठी येत आहेत. ठोंबरे कुटुंबियांनी उपमुख्यमंत्री सहायता कक्ष यांचे व कैलास कावरे यांचे विशेष आभार मानले आहेत.

## आज तालमार्तंड प्रकाश बोरगावकर यांच्या शिष्य परिवारातर्फे गुरुपौर्णिमा सोहळा

अंबाजोगाई । प्रतिनिधी



मराठवाड्यातील प्रसिद्ध बनारस घराण्याचे तबलावादक, संगीत संयोजक व सामाजिक कार्यकर्ते तालमार्तंड प्रकाश बोरगावकर यांच्या सर्व शिष्य वृंदाच्या वतीने गुरुवार दि आज गुरुवार ११ जुलै २०२५ रोजी आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृह अंबाजोगाई या ठिकाणी सायंकाळी सहा वाजता भव्य गुरुपौर्णिमा उत्सव व गुरुपूजन सोहळ्याचे आयोजन केलेले आहे. ज्येष्ठ मार्गदर्शक व सामाजिक कार्यकर्ते नंदकिशोर मुंदडा यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणाऱ्या या कार्यक्रमासाठी अपर जिल्हाधिकारी अश्विनी जिरंगे, उपविभागीय अधिकारी दीपक वजाळे, बनेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव डॉ.नरेंद्र काळे, पोलीस निरीक्षक शरद जोगदंड आदी उपस्थित राहणार आहे.

गुरुपूजन सोहळ्यानंतर तबला विश्वातील आश्चर्य म्हणून ओळखला जाणारा, विख्यात गुरु सुशीलकुमार जैन यांचा कृपा पात्र शिष्य स्वरित बळवंत यांचे स्वतंत्र तबलावादन, तालमार्तंड प्रकाश बोरगावकर यांचे शिष्य आंतरराष्ट्रीय ख्यातीचा संगीत संयोजक ओंकार रापतवार, लोकगीतांचा बादशहा शाहीर तुकाराम सुवर्णकार, अवघ्या महाराष्ट्राच्या तरुणाईच्या गळ्यातील ताईत असणारा गायक अभिजीत जाधव, योगेश स्वामी यांच्यासह सर्व शिष्यांचे बहारदार सादरीकरण होणार असून या कार्यक्रमासाठी सर्व संगीत साधक, रसिक श्रोते यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाचा आस्वाद घ्यावा असे आवाहन तालमार्तंड प्रकाश बोरगावकर शिष्य परिवाराच्या वतीने मानसोपचार तज्ञ डॉ.राजेश इंगोले, शाहीर तुकाराम सुवर्णकार, ओंकार रापतवार, युवा गायक अभिजीत जाधव, रंगकर्मी प्रवीण जोगदंड, योगेश स्वामी, अभय जोशी, नाना गायकवाड, बालाजी शेरेकर, परमेश्वर गित्ते, प्रदीप चोपणे व सर्व संयोजन समिती यांच्या वतीने करण्यात येत आहे.

## स्वानंद वाचनालयात चला घडवूया विकसित महाराष्ट्र २०४७ जन जागृती मार्गदर्शन व पोस्टर प्रदर्शन




केज । प्रतिनिधी

स्वानंद सार्वजनिक वाचनालय, आनंदगांव ता.केज येथे चला घडवूया विकसित महाराष्ट्र विकसित महाराष्ट्र २०४७ महाराष्ट्राचे व्हिजन डॉकुमेंटसचे ग्रंथालयात भिंतीवर पोस्टर लावून जनजागृती व ग्रंथालयात मार्गदर्शन कार्यक्रम घेऊन नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन नागरीक सर्वेक्षण कालावधी १८ जुन ते १७ जुलै २०२५ यासंदर्भातील लोक सहभाग वाढावा व जास्तीत जास्त लोकांनी या ऑनलाईन सर्वेक्षणात सहभागी व्हावे याकरिता पोस्टर प्रदर्शन व मार्गदर्शन कार्यशाळा घेण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष, जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड हे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून माजी सरपंच ज्ञानेश्वर संभाजी गायकवाड, माजी उपसरपंच बालासाहेब गायकवाड, रविंद्र गायकवाड पेन्टर यांनी मार्गदर्शन केले. प्रमुख उपस्थितीत रावसाहेब जाधव, वैजनाथ गायकवाड, पांडूरंग गायकवाड, रावसाहेब गायकवाड, मंचकवैरागे, बाळासाहेब गायकवाड, रामराव गायकवाड, नारायण गायकवाड, बालासाहेब वैरागे, प्रभू गायकवाड, नांदे मामा, अरुण गायकवाड, लक्ष्मी चौरे, प्रतिक्षा चौरे, अश्वीनी वैरागे यांची प्रमुख उपस्थिती होती.

## नाव्होली येथील पांडुरंगाच्या भेटीसाठी भक्तांची मांदियाळी!

### तरुणाईच्या मदतीने आणि गावकऱ्यांच्या वतीने आलेल्या भक्तांना दर्शनाबरोबर फराळाची उत्तम व्यवस्था

केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील नाव्होली येथे साक्षात पंढरीच्या पांडुरंगाने भेट दिलेल्या विठ्ठलाचा महिमा दिवसेंदिवस वाढत असून या विठुरायाच्या दर्शनासाठी आषाढी वारी निमित्त अनेक ठिकाणांहून भक्तगण येत असल्याने गावकऱ्यांनी दरवर्षी प्रमाणे यावर्षी देखील तरुणाईच्या मदतीने आणि गावकऱ्याने आलेल्या भक्तांना दर्शनाबरोबर फराळाची उत्तम व्यवस्था केल्याने समाधान व्यक्त होत आहे.



या बाबत सविस्तर माहिती अशी की केज तालुक्यातील नाव्होली येथे दि. १४ मे २०१४ रोजी नाव्होली येथील देशमुख कुटुंबांच्या मोरवंडी नावाच्या शेतात ते नांगरणी करत असताना नांगराच्या तासांमध्ये शाडू मिश्रित असणारी चार फूट उंचीची पांडुरंगाची मूर्ती नांगराच्या फाळाला अडकून वर आल्याने त्या परिवाराने त्या पांडुरंगाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना गावालगत असलेल्या शेरी वस्तीमध्ये केलेली आहे. तेव्हांपासून आजपर्यंत नाव्होलीच्या ग्रामस्थांनी या विठ्ठलाची मनोभावे पूजा अर्चा केलेली असून आजही त्याची महिमा मोठ्या प्रमाणामध्ये दिसून येत आहे. माळरानावर सापडलेल्या या पांडुरंगाला भेटण्यासाठी केज तालुक्यासह धाराशिव व संपूर्ण बीड जिल्ह्यातून आषाढी वारी निमित्त या दिवशी भक्तगण नाव्होली गावांमध्ये येत आहेत. त्याचबरोबर या परिसरातून मोठ्या प्रमाणामध्ये दिंड्या तर दैठणा, बहुला, नांदूरघाट, काळेगावघाट, अरणगाव, उत्तरेश्वर पिंपरी या ठिकाणावरून दिंड्याचे आगमन झालेले होते. त्यामुळे नाव्होली येथील या विठुरायाचा महिमा दिवसेंदिवस वाढत चाललेला आहे. गेली ११ वर्षांपूर्वी माळरानावर सापडलेली ही विठ्ठलाची मूर्ती या वर्षापर्यंत एका पत्र्याच्या शेडमध्ये स्थापन करण्यात आलेली होती. मात्र गावचे सरपंच आणि ग्रामस्थांच्या सहकार्याने आता या ठिकाणी विठ्ठलाचे मोठे मंदिराचे बांधकाम सुरू असून मंदिरासमोर मोठा सभा मंडप तयार करण्यात आलेला आहे. काही दिवसा त्याचे काम पूर्णत्वास जाणार असून लवकरच या नव्याने उभारण्यात आलेल्या मंदिरामध्ये या विठ्ठलाच्या मुर्तीची पुनर्स्थापना करण्यात येणार असून याठिकाणी उभारण्यात येत असलेल्या या भव्य दिव्य मंदिरात येणाऱ्या भक्त गणांसाठी या ठिकाणी सर्व सोय करण्यात येणार आहे.

घेऊन भक्तगण या विठ्ठलाच्या दर्शनासाठी येताना आपल्याला पहावयास मिळतात. त्यामुळे आलेल्या भक्तगणांची गैरसोय होऊ नये. म्हणून कालच्या आषाढी वारी निमित्त नाव्होलीच्या सर्व ग्रामस्थांनी तरुणाईच्या मदतीने आणि गावकऱ्यांच्या सहकार्याने आलेल्या भाविक भक्तांना फराळाची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. यामध्ये शाबू खिचडी, नायलॉन शाबू, केळी, भगर खिचडी अशा विविध प्रकारचे फराळ या ठिकाणी प्रसाद स्वरूपामध्ये भक्तगणांना वाटप करण्यात आला. ही फराळाची व्यवस्था सकाळी८:०० वाजल्यापासून ते संध्याकाळी ११:०० वाजेपर्यंत सुरू होते. सकाळपासूनच विठ्ठलाच्या मंदिराकडे भक्त जणांची रांग लागलेली होती.

## जिजाऊ ब्रिगेड विभागीय उपाध्यक्षपदी शिवमती सुवर्णाताई गिर्हे यांची निवड

आष्टी । प्रतिनिधी



मराठा सेवा संघाच्या विविध कक्षांच्या पुनर्बांधणीसाठी केंद्रीय निवड समितीची बैठक ५ जुलै २०२५ रोजी विश्रामगृह बीड येथे झाली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी समिती प्रमुख शिवश्री संदिपान जाधव हे होते.

यावेळी बीड जिल्हा जिजाऊ ब्रिगेडच्या अध्यक्षा शिवमती सुवर्णाताई बाळासाहेब गिर्हे यांच्या कामाची दखल या समितीने घेतली आणि त्यांची जिजाऊ ब्रिगेडच्या विभागीय उपाध्यक्षपदी निवड केली आहे. बीड व धाराशिव जिल्ह्यात जिजाऊ ब्रिगेडच्या शाखा सर्व तालुक्यामध्ये कार्यान्वित करण्याचा मनोदय या निवडीनंतर सुवर्णाताई गिर्हे यांनी बोलून दाखवला. यापूर्वी त्यांनी आष्टी तालुका जिजाऊ ब्रिगेडचे अध्यक्षपदही भूषविले आहे. या निवडीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

मराठा सेवा संघाचे विभागीय अध्यक्ष अशोक ठाकरे, बीड जिल्हा अध्यक्ष धनंजय शेंडगे, नागनाथ जाधव, आष्टी तालुकाध्यक्ष इंजि. तानाजी जंजिरे, लक्ष्मण रेडेकर, अॅड. सीताराम पोकळे, शिवश्री बन्सीधर मोरे, प्रा. डॉ.दत्तात्रय नरसाळे, शिरीषभाऊ थोरवे, भास्करराव निंबाळकर जनहित लोकशाही पार्टी बीड जिल्हाध्यक्ष सुरेश कांबळे तसेच अनेक मान्यवरांनी शिवमती सुवर्णाताई गिर्हे यांचे अभिनंदन केले आहे.

# पीपल्स एज्युकेशन सोसायटीचा वर्धापन दिन उत्साहात संपन्न

## महामानव अभिवादन ग्रुप तर्फे पे बॅक टू सोसायटी म्हणून समाज उपयोगी उपक्रमात वाढ करणार

बीड । प्रतिनिधी

शिका संघटित व्हा व संघर्ष करा हा डॉ. बाबासाहेबांचा बहुमोल उपदेश लक्षात ठेऊन महामानव अभिवादन ग्रुप पुढे गेलेल्यांनी मागे असलेल्या समाज बांधवांकरिता बीड शहरात व परिसरात विविध समाज उपयोगी उपक्रम राबवत आहेत. डॉ. बाबासाहेबांनी ८जुलै १९४५ रोजी स्थापन केलेल्या पीपल्स एज्युकेशन सोसायटीचा ८० वा वर्धापन दिन धम्मदीप बुद्ध विहार बलभीम नगर, शिवाजीनगर बीड येथे मोठ्या उत्साहात विद्यार्थी व पालक यांच्या उपस्थितीत संपन्न करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षपदी से.नि.सी.ई.ओ (जी प) पी.व्ही. बनसोडे हे लाभले होते तर से.नी उपनिबंधक (सहकार) ड. हनुमंत कांबळे व से.नि जिल्हा प्रबंधक (एल.आय. सी) आयु. यु.एस. वाघमारे लाभले होते. विचार मंचावर अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जि.एम.भोले, वाचाल तर वाचाल चे अध्यक्ष डी.जी.वानखेडे व समता सैनिक दलाचे मेजर कॅप्टन राजाभाऊ आठवले, युवराज सोनवणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते तथागतांच्या प्रतिमेस पुष्प, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर व माता रमाईच्या प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ड तेजस वडमारे यांनी केले तर प्रास्ताविक जी.एम भोले यांनी करून आपल्या प्रास्ताविकात पी ई एस सोसायटीच्या स्थापने मागची डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका सविस्तरपणे विषद केली व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पे बॅक टू सोसायटी या उपदेशानुसार समाजातील दानदात्याच्या भरघोस मदतीच्या जोरावर सध्या सुरू असलेल्या २ मोफत शिकवणी



वर्गासह गोरगरीब, मजुरांच्या व गरजू मुलांकरिता आणखी २ ठिकाणी मोफत शिकवणी वर्ग सुरू करण्यात येणार आहेत असे स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष पी.व्ही बनसोडे उपस्थिताना संबोधित करताना म्हणाले की शिक्षणाशिवाय माणसाची सर्वांगीण प्रगती होऊ शकत नाही. स्वातंत्र्यपूर्व काळात अनिष्ट रूढी परंपरेमुळे वर्गाच्या बाहेर बसून शिक्षण प्राप्त करणाऱ्या भीमराव या विद्यार्थ्याने विद्येच्या बळावर खंडप्राय आशा भारत देशाचे संविधान लिहिले हे केवळ शिक्षणामुळे साध्य होऊ शकले हे शिक्षणाचे महत्त्व प्रत्येकाने ओळखले पाहिजे. भीमरावांना छत्रपती शाहू महाराज, बडोदा नरेश सयाजीराव गायकवाड महाराज यांच्या बहुमोल सहाय्यामुळे परदेशातील नामांकित विद्यापीठातून उच्च विद्याविभूषित होऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी संपूर्ण त्याचे संपूर्ण जीवन देश हिताकरिता व संपूर्ण मानव जातीच्या कल्याणा करता अर्पण केले. त्यांनी स्थापन केलेल्या पी ई एस शिक्षण संस्थेतून शिक्षणापासून वंचित असलेल्या व सर्व समाजातील लाखो विद्यार्थी शिकून उच्च पदापर्यंत पोहोचले त्यांचे हे ऋण शिकलेल्यांनी समाजाचे रून फेडण्याचे कार्य डोळ्यासमोर ठेवून आपले जीवन जगणे गरजेचे आहे असे अनेक उदाहरणाद्वारे समजावून सांगितली.

याप्रसंगी प्रशांत वासनिक यांनी विद्यार्थी व पालकांशी हितगुज साधतांना स्पष्ट केले की शिक्षण क्षेत्रात राजा मिलिंद सारखे विद्यार्थी व भंते नागसेन सारखे गुरु असावयास पाहिजेत भारत भूमीला जगप्रसिद्ध नालंदा, तक्षशिला अशा विद्यापीठांची परंपरा आहे याचा सर्वांनि सार्थ अभिमान ठेवून विद्यार्थ्यांनी राजा मिलिंद सारख्या विद्यार्थ्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून विद्या प्राप्त करावी आशा अनेक उदाहरणाद्वारे समजावून सांगितले, प्रमुख पाहुणे हनुमंत कांबळे यु एस वाघमारे युवराज सोनवणे यांनी पी ई एस शिक्षण संस्थेबद्दल व शिक्षण हीच उन्नतीची गुरुकिल्ली आहे हे स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डी एम राऊत यांनी व्यक्त केले तर कार्यक्रमास प्रा. अशोक गायकवाड, के एस वाघमारे, एस.एस.सोनवणे, बी.जी. दळवी, भारत शिरसट, तेजस वडमारे, सुजाता वाघमारे, अंजली विशाल वडमारे, आशाबाई भालेराव, स्वाती वडमारे, आचल वडमारे, कु.किरण वडमारे, रमाबाई सोनवणे, उर्मिला वडमारे, राज जाधव, प्रेम जोगदंड, सिद्धार्थ साळवे व परिसरातील बालक बालिका व उपासक उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते. महामानव अभिवादन ग्रुप तर्फे शालेय साहित्य वाटप कार्यक्रमांतर्गत २३ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य (वही पेन) व खाऊ वाटप करून सरनातंय ने कार्यक्रमाची सांगता झाली.

# शिक्षण विभागातील अनेक गंभीर घोटाळे बाहेर काढल्यामुळे माझ्यावर खोटा गुन्हा दाखल करण्यात आला : इंजिनियर सादिक इनामदार

## प्रामाणिक समाजसेवकांवर खोटे गुन्हे - ही लोकशाहीची शोकांतिका

## इंजि. सादेक इनामदार यांची पत्रकार परिषदेत भावनात्मक प्रतिक्रिया

बीड । प्रतिनिधी

भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि निस्वार्थ समाजसेवेसाठी ओळखले जाणारे सामाजिक कार्यकर्ते इंजिनिअर सादिक इनामदार यांच्यावर दाखल करण्यात आलेला विनयभंगाचा गुन्हा खोटा असून तो सूडबुद्धीने दाखल करण्यात आला आहे, असा आरोप त्यांनी आज आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत केला.

बीड येथील शासकीय विश्रामगृहात पार पडलेल्या या पत्रकार परिषदेत इनामदार यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, मी आजवर अनेक भ्रष्टाचार प्रकरणांची चौकशी व उकल केली आहे. जिल्हा परिषदेतील शिक्षक भरतीतील कथित गैरप्रकार उघडकीस आणल्यामुळेच माझ्यावर दबाव आणण्यासाठी व बदनाम करण्यासाठी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) श्रीमती प्रियाराणी पाटील यांच्या द्वारे खोटा गुन्हा दाखल करण्यात आला.



ते पुढे म्हणाले की, गुन्हा दाखल झाला तेव्हा मी धारूर पोलीस स्टेशनमध्ये उपस्थित होतो, त्याचबरोबर, वैध शस्त्र परवाना असूनही कोणताही गैरवापर न करतानाही माझा शस्त्र परवाना रद्द करण्यात आला, हे माझ्या सुरक्षेसाठी अत्यंत गंभीर आहे. माझ्या जीवाला काही धोका झाला, तर जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक जबाबदार असतील, असा थेट इशाराही त्यांनी दिला.

पत्रकार परिषदेद्वारे इंजिनीयर सादिक इनामदार यांनी खालील मागण्या केल्या. दाखल खोटा गुन्हा तात्काळ मागे घ्यावा. शिक्षणाधिकारी प्रियाराणी पाटील यांच्यावर कारवाई करून त्यांना निलंबित करण्यात यावे. माझ्या जीवितास धोका असून मला तात्काळ शस्त्र परवाना परत बहाल करण्यात यावा. जर या मागण्या पूर्ण झाल्या नाहीत, तर अनेक सामाजिक संस्था व कार्यकर्त्यांना सोबत घेऊन लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा स्पष्ट इशाराही इनामदार यांनी दिला.

# तहसीलदार संदीप खोमणे साहेब तुमचंच कार्यालय न्यायांपासून वंचित? मगं सामान्य लोकांचे काय?

## तहसील कार्यालय परिसरात स्वच्छतागृहाची सोय करण्याची जनतेकडून मागणी

गेवराई । प्रतिनिधी

तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या गेवराई तहसीलदार कार्यालयात सामान्य नागरिकांना स्वच्छतागृहाची सोय नसल्याने त्यांना इतरत्र जावे लागते. त्यामुळे स्वच्छता गृहाची सोय तहसीलदार कार्यालय परिसरात केली पाहिजे, अशी जनतेकडून मागणी केली जात आहे. या पूर्वी तहसीलदार कार्यालयातील शेतकरी संबंधित कामकाज असलेल्या विभाग कार्यालयाशेजारी स्वच्छतागृह होते, पण आता सामान्य नागरिकांसाठी ते तेही तहसीलदार कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी बंद करून ठेवलेले असल्याने सामान्य नागरिकांना तहसील कार्यालयातील उभा असलेल्या वाहनाच्या आडोशाला स्वच्छता गृहा वापर करावा लागत आहे. येणाऱ्या जाणाऱ्या लोकांची व महिलांची या कार्यालयात स्वच्छतागृह नसल्यामुळे नागरिकांची गैरसोय होत आहे.



आपल्या विविध प्रकारच्या कामांसाठी गेवराई तहसीलदार कार्यालयात बाहेरगावांहून ग्रामीण भागातून येणाऱ्या नागरिकांची मोठी गर्दी असते. आता शालेयपूर्व दाखल्यांसाठी नागरिकांची गर्दी मोठ्या प्रमाणात दिसू लागली आहे. महिला तसेच वयोवृद्ध नागरिकांना स्वच्छतागृहाची आवश्यकता भासते. स्वच्छतागृह कुठे आहे? असे महिला विचारू शकत नाहीत. तहसीलदार संदीप खोमणे साहेब एवढ्या मोठ्या तहसील कार्यालयात स्वच्छतागृह नसल्याने आश्चर्याची बाब आहे मात्र याकडे सबब दुर्लक्ष केले जात आहे स्वच्छतागृह असणे आवश्यक असताना तहसील कार्यालयातील उभा असलेल्या वाहनाच्या आडोशाला स्थानिक लोक लघुशंका करतात याची दुर्गंधी सर्वत्र येत असल्यामुळे लोकांना नाकाला रुमाल बांधून कार्यालयात प्रवेश करावा लागतो तीन मधली मुख्य इमारत असलेल्या तहसील कार्यालयात जर स्वच्छतागृह उपलब्ध नसेल तर काय उपयोग न्याय दंडाधिकारी म्हणून तहसीलदार कार्यरत असतात पण स्वतःच्या कार्यालयाला न्याय देऊ शकत नसतील तर काय उपयोग असा सवाल सामान्य जनतेकडून उपस्थित केला जात आहे.

तसेच या विविध कामासाठी येणाऱ्या लोकांची गैरसोय होत असल्याने नागरिकांना त्रास होतो. त्यामुळे त्यांची नाराजीही आहे. महिला आणि वयोवृद्ध नागरिकांना स्वच्छतागृहासाठी उपलब्ध सुविधा नसल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे सूर उमटत आहेत.

# महाराष्ट्र आधार सेना ऊसतोड कामगार आघाडीच्या उपाध्यक्षपदी शक्ती आवाड यांची निवड

वडवणी । प्रतिनिधी

ना जातीचा ना धर्माचा एक हात मदतीचा एक सामाजिक संघटन उभा केलेला आहे. या सामाजिक संघटनेची ताकद वाढविण्यासाठी आज वडवणी तालुक्यातील दुकडे गाव या गावातील रहिवासी असलेले सामाजिक कार्यकर्ते जे के सर्वसामान्यांच्या मदतीला धावून जाणारे व्यक्तिमत्व असलेले शक्ती आव्हाड यांची वडवणी तालुका ऊसतोड कामगार सेनेच्या उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली.





यावेळी त्यांच्या निवडीचे पत्र देऊन त्यांचा सत्कार करताना वडवणी तालुका अध्यक्ष सतीश हनवते, महाराष्ट्र आधार सेना उपजिल्हाप्रमुख अनिल भैय्या आव्हाड, अमोल मुजमुले, अरण सरवदे, बाबू हतागळे, धारूर तालुका ऊसतोड कामगार तालुकाप्रमुख अर्जुन बाबु पाटोळे, वडवणी तालुका अध्यक्ष ऊमेश हनवते, पपू कराड, शेख सिद्दीकी, शक्ती आवड यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यासाठी बीड येथील महाराष्ट्र आधार देण्याच्या संपर्क कार्यालयामध्ये संस्थापक अध्यक्ष दीपक थोरात, महाराष्ट्र आधार सेना कार्याध्यक्ष उद्धव आरे यांनी बीड येथील कार्यालयांमध्ये सत्कार करत पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

# माजलगावमध्ये मानवी हक्क अभियानचा इशारा मोर्चा

## या मोर्चाला हजारोच्या संख्येने उपस्थित रहा : रमेश गवळी

माजलगाव । प्रतिनिधी



माजलगाव तालुक्यातील उपविभागीय कार्यालय या ठिकाणी दि,१४.७.२०२५.वार सोमवार ठीक १२:३० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते माजलगाव उपविभागीय कार्यालय असा मानवी हक्क अभियान च्या वतीने इशारा मोर्चा होणार आहे.

मानवी हक्क अभियानचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. मिलिंद नाना आवाड साहेब विविध मागण्यासाठी या मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या मोर्चाचे नेतृत्व मानवी हक्क अभियानचे जिल्हाध्यक्ष मा.राजेश भाऊ क्षीरसागर करणार आहेत. या मोर्चाला माजलगाव तालुक्यातील सर्व समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान मानवी हक्क अभियानचे ज्येष्ठ नेते रमेश गवळी यांनी केले आहे.

# शेतकऱ्यांना दुबार पेरणीसाठी हेक्टरी २५ हजार अनुदान द्यावे

## वडवणीत महाविकास आघाडीचे तहसीलदारांना निवेदन

वडवणी । प्रतिनिधी

पावसाळ्यात पावसाअभावी संपूर्ण जून महिना कोरडा गेला आहे. वडवणी तालुक्यात जवळपास शंभर टक्के पेरण्या मागच्या महिन्यातच पूर्ण होवून शेतकऱ्यांच्या नजरा आभाळाकडे लागलेल्या आहेत. मात्र पाऊस काही पडेना. परिणामी शेतकऱ्यांवर आता दुबार पेरणी करण्याची वेळ आली असून यासाठी शासनाने शेतकऱ्यांना दुबार पेरणीसाठी हेक्टरी २५ हजार रुपयांचे तातडीने अनुदान द्यावे यासह इतर मागण्यांसाठी वडवणी तालुक्यातील महाविकास आघाडीच्या वतीने तहसीलदारांना लेखी निवेदन देण्यात आले.




वडवणी तालुका महाविकास आघाडीच्या वतीने काल दि.७ जुलै २०२५ सोमवार रोजी वडवणी तहसील कार्यालय येथे तहसीलदार यांना शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांबाबत लेखी निवेदन देण्यात आले. या निवेदनात शेतकऱ्यांना दुबार पेरणी करण्यासाठी हेक्टरी २५ हजार रुपये तातडीचे अनुदान देण्यात यावे, पीएम किसान योजना व सीएम किसान योजना याचे सर्व थकीत लाभ शेतकऱ्यांना देण्यात यावेत, शासनाने बंद केलेली एक रुपयांत पीक विमा योजना तातडीने चालू करण्यात यावी, यांसह इतर मागण्यांचे निवेदन तहसीलदार यांना देण्यात आले.

यावेळी महाविकास आघाडीचे शिवसेना तालुकाप्रमुख विनायक बप्पा मुळे, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे तालुकाध्यक्ष महादेव भाऊ जमाले, युवराज शिंदे, महादेव सातपुते, भास्कर उजगरे, मुन्ना पवार, खलील पठाण, अंबादास जाधव, संजय धपाटे, शहादेव लोंढे, सुरेश सावंत, उध्दव काकडे, कचरु जाधव, श्रीराम झाटे, प्रकाश शिंदे, नवनाथ मोरे, अविनाश बोंद्रे, शुभम मस्के, अजय खांडवे, सिध्देश्वर जाधव, माऊली सवासे, पवन सवासे, महादेव राठोड, नेताजी डांबे, परमेश्वर नागवे, प्रकाश वजीर, शहाजी लोकरे, परम ऋश्वर कानडी, शिवाजी कदम, विकास पटाईत, प्रकाश राठोड, कल्याण काळे, रंगनाथ सोळंके, कल्याण शेंडगे यांसह महाविकास आघाडीचे पदाधिकारी, शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान या मागण्या मान्य झाल्या नाहीत तर महाविकास आघाडीच्या वतीने तहसीलवर मोर्चा काढण्यात येईल असाही इशारा या निवेदनातून देण्यात आला आहे.

# बीड स्थानक येथे बस चालकास धमकावुन दहशत निर्माण करणाऱ्या दोन इसमांना शिवाजीनगर पोलीसांनी तासाभरात केले जेरबंद

बीड । प्रतिनिधी

दिनांक ०७/०७/२०२५ रोजी रात्री ८:३० वा. चे सु. बस स्थानक बीड इन गेट जवळ फिर्यादी बस चालक नामे इरफान निजाम शेख वय ३६ वर्षे, व्यवसाय बस चालक रा. नवगाग राजुरी ता. जि.बीड हे उभे असतांना सदर ठिकाणी त्यांचे ओळखीचे जगताप यांचे सोबत दोन इसमांनी झटापट करुन शिवीगाळ केली. त्यावेळी सदर फिर्यादी तेथे गेले असता त्यांनी पाहिले की, त्यातील एका जाड तब्बेत असलेल्या व पांढरा शर्ट व निळया रंगाची पॅन्ट असलेल्या इसमाने तुझा काय संबंध असे म्हणुनं फियांदी यांना त्याच्या कंबरेची पिस्तुल काढुन धमकावले व त्यानंतर ते त्यांचेजवळील बुलेट मो.सा. चक २३ इच् ७३८७ वर पळुन गेले. वगैरे मजकुराचे फिर्यादी वरुन शिवाजीनगर पोलीस ठाणे, बीड येथे गुन्हा दाखल झाला.

नमुद गुन्ह्याची गांर्भीयाने दखल घेवुन पोलीस निरीक्षक किशोर पवार यांनी आरोपीचा शोध होणेकामी पोलीस पथक रवाना केले. नमुद पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी सी.सी.टि.व्ही. फुटेजची पाहणी करुन त्याद्वारे आरोपीं निष्पन्न करुन त्यांचा शोध घेत असतांना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, आरोपी १) अभिजीत दिलीपराव जाधव वय २३ वर्षे रा. पंचशील नगर, बीड हा नालंदा कॉलनी बीड येथे असलेले बाबत तसेच आरोपी क्र. २) अभिजीत कमलाकर कांबळे हा बीड शहरातील माळीवेस परीसरात असल्याची खात्रीशीर माहिती मिळालेने सदर ठिकाणी दोन पथके रवाना करुन दोन्ही आरोपींना ताब्यात घेतले. त्यावेळी आरोपी क्र. २) अभिजीत कमलाकर कांबळे वय २३ वर्षे रा. माळीवेस बीड ता.जि.बीड याचेकडुन गुन्ह्यात वापरलेली एक लोखंडी पिस्टल जु.वा.किं. १०,०००/- रु. किं. जप्त करण्यात आले. सदर पिस्टलची पाहणी केली असता ते बनावट असल्याचे आढळुन आले. तसेच आरोपी यांनी गुन्ह्यात वापरलेली बुलेट मो.सा. क्र. चक २३ इच् ७३८७ ही त्यांचेकडुन जप्त करण्यात आली आहे. यातील आरोपी क्र. २ अभिजीत कमलाकर कांबळे याचे विरुध्द यापुर्वी बीड शहर पोलीस ठाणे येथे जबरी चोरीचा गुन्हा दाखल आहे.



सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. नवनित कॉंवत साहेब, अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर साहेब, उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग, बीड कमलेश मिना साहेब, यांचे मार्गदर्शनाखाली शिवाजीनगर पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक श्री. किशोर पवार, स्थागुशा चे पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी बंटेवाड, पोहवा/१६६४ आघाव, पोना/४७० मराडे, पोशि/२२१९ शिंदे, पोशि/६१७ राडकर, पोशि/२०७७ रहाडे, पोशि/९०४ महानोर, पोशि/६६५ आगलावे, पोशि/५११ सानप, पोशि/३२० रणदिवे, पोशि/३०५ राठोड पोशि/४८५ कांदे व स्थागुशा, बीड येथील पोलीस अंमलदार मनोज पश्जने व सय्यद अशपाक यांनी केली अंसुन सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ/२८९ खेडकर हे करत आहेत.

# पैशाच्या वादामुळे तरुणाचा मृत्यू

## नऊ दिवस उलटून सुद्धा दोन आरोपी फरार

मानवत । प्रतिनिधी

परभणी जिल्ह्यातील मानवत येथील इरफान खय्युम आतार याला पत्त्याचे पैसे दे म्हणत तीन तरुणांनी तीक्ष्ण हत्याराने वार करून जखमी केल्याची घटना २९ जूनला घडली होती. उपचारादरम्यान या जखमी तरुणाचा तीन जुलैला रात्री मृत्यू झाला. आता यामध्ये खुनाचे कलम लावण्यात येणार असल्याची माहिती पोलिस सूत्रांनी दिली. २९ जूनला खय्युम अत्तार करीम अत्तार यांनी दिलेल्या तक्रारीत नमूद केले.




घरासमोर मुलगा इराफन याला करण ऊर्फ पप्पू शिवाजी मोरे याने पत्त्वाचे पैसे दे म्हणत तोंडावर, डोक्यावर तीक्ष्ण हत्याराने वार करून मारू लागले, पैसे दिले नाही तर तुला जिवे मारून टाकतो, अशी धमकी दिली होती. घटनेत गंभीर जखमी झालेल्या इरफान आत्तार याच्यावर पाच दिवसांपासून नांदेडच्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरू होते. तोंडावर, डोक्यावर तीक्ष्ण हत्याराने जखमा झाल्याने सुरुवातीपासून इरफानची तब्येत खालावल्याचे दिसून आले होते. पाच दिवसांनंतर इरफानचा गुरुवारी मृत्यू झाला. घटनेप्रकरणी जखमी तरुणाचे वडील खय्युम अत्तार करीम अत्तार यांच्या तक्रारीवरून करण ऊर्फ पप्पू शिवाजी मोरे विरुद्ध तीक्ष्ण हत्याराने वार करून जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा केल्यानंतर या प्रकरणात आणखी दोन संशयित मुलं असल्याची माहिती मिळत असून, खुनाचे कलम वाढविण्यात येणार असल्याची माहिती पोलिस सूत्रांनी दिली. यामधील एक तरुण पोलिसांच्या ताब्यात असून दोन तरुण अजून सुद्धा फरार असल्याची माहिती इरफान आतार यांच्या नातेवाईकाकडून देण्यात आली आहे तरी पोलिसांनी तातडीने शोध घेऊन आरोपींना तात्काळ अटक करावी अशी मागणी मुलाच्या नातेवाईकाकडून करण्यात येत आहे.

# पंकजाताई मुंडेंचा लढावू बाणा; विरोधी व सत्ताधारी आमदारांकडून प्रश्नांची चौफेर सरबत्ती पण अशी लढवली खिंड की, उपसभापतींनी केलं उत्तराचं जाहीर कौतुक!

मुंबई । प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या लढावू बाण्याचे दर्शन नुकतेच विधीमंडळ सभागृहाला झाले. एकच विषय घेवून विरोधी व सत्ताधारी आमदारांकडून त्यांचेवर प्रश्नांची चौफेर सरबत्ती करण्यात आली पण त्यांनी अशी काही खिंड लढवली की, त्यांनी दिलेल्या उत्तराचे उपसभापतींनी जाहीर कौतुक केलं.

झालं असं की, मुंबईच्या अंधेरी परिसरातील तब्बल ३०० एकर कांदळवन व वृक्षतोडीच्या विनाशकारी हस्तक्षेपाची विधानपरिषदेमध्ये नुकतीच सविस्तर व तपशीलवार चर्चा झाली. पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडेंनी सभागृहात पर्यावरण विभाग व सरकारची याबाबतची सडेतोड भूमिका मांडली. विशेष म्हणजे या मुद्द्यावरून पंकजाताई मुंडेंवर विरोधी पक्षातील व सत्ताधारी आमदारांकडून प्रश्नांची चौफेर सरबत्ती करण्यात आली.



विधानपरिषद सदस्य अनिल परब यांनी सभागृहात कांदळवन वृक्ष तोडीचा लक्षवेधी प्रस्ताव मांडला होता. त्यांनी सांगितले की, अंधेरीतील सुमारे ३०० एकर भूखंडावर अवैधपणे माती भरून समुद्राच्या पाण्याचा नैसर्गिक प्रवाह रोखण्यात आला आहे. सीआरझेड-१ क्षेत्रात भराव टाकून जागा हडप करण्यात आली असून, संबंधितांवर केवळ गुन्हा दाखल झाला आहे, मात्र कोणतीही ठोस कारवाई अद्याप झालेली नाही, हेही त्यांनी अधोरेखित केले. यावर आपण प्रत्यक्ष पाहणी करून दोषींवर सर्वोच्च जी असेल ती कारवाई करु असे उत्तर पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांनी दिले. या मुद्यावर अनिल परब, भाई जगताप, प्रवीण दरेकर, सचिन आहिर आदी सदस्यांनी सभागृहात अनेक प्रश्न उपस्थित केले. या प्रकरणातील गंभीरता लक्षात घेता, सर्व संबंधित विभागांना एकत्र करून वास्तविक परिस्थितीची चौकशी करून योग्य ती कारवाई करण्यात येईल तसेच मी स्वतः सर्व संबंधित लोकप्रतिनिधी व अधिकारी यांना सोबत घेऊन पहाणी केल्यानंतर आवश्यक असेल तर चौकशी समिती नेमू अशी ग्वाही पंकजाताई मुंडे यांनी सभागृहात दिली व सर्वांचे समाधान होईल अशी उत्तराची प्रगल्भ मांडणी केली.

**नीलम गोऱ्हेंकडून पंकजाताईंचे कौतुक**

उपसभापती डॉ. निलम गोऱ्हे यांनी अधिवेशन १८ जुलैला संपणार असुन पुढील अधिवेशन डिसेंबरमध्ये होणार आहे. तोपर्यंत या विषयाकडे दुर्लक्ष होता कामा नये. त्यामुळे वन विभाग, पर्यावरण विभाग आणि संबंधित अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक तातडीने आयोजित केली जावी. सन्माननीय मंत्री महोदयांनी १२ किंवा १३ जुलै रोजी प्रत्यक्ष जागेची पाहणी करून १४ तारखेपर्यंत संबंधित बैठक घ्यावी, असेही त्यांनी सुचवले. या विषयावर वन विभाग आणि संबंधित विभाग यांची एकत्र बैठक मुख्यमंत्र्यांनी घेण्यासाठी आम्ही प्रयत्न करू, असेही त्यांनी सांगितले. जर ही बैठक झालीच नाही, तरीही १८ तारखेच्या आत आपण एक बैठक आयोजित करू, असे त्या म्हणाल्या. उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी विशेष नमूद करतांना सांगितले की, या विषयावर अनेक वेळा चर्चा झाली असली तरी, इतक्या तपशीलवार स्वरूपाची मांडणी याआधी कधीही झाली नव्हती. पर्यावरण मंत्र्यांकडून अतिशय चांगले उत्तर मिळाले असुन यापुर्वी अशी तपशीलवार स्वरूपाची मांडणी कोणीच केली नसल्याचे जाहीर कौतुक सभागृहात केले.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT